
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL



Volume - XI, Issue - II
April - June - 2022
MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II

April - June - 2022

MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | वर्तमानकाळात चीनचे विस्तारवादी धोरण आणि भारत<br>**प्रा. धप्पाधुळे रामेश्वर शंकरराव** | ६०-६४ |
| १४ | कौटिल्य नीतीवर आधारित भारताचे परराष्ट्र धोरण<br>**डॉ. तेजस्विनी गणपतराव कुलकर्णी** | ६५-६७ |
| १५ | भूराजनीतीक संकल्पना, मूलभूत तत्वे, आणि जागतिक पर्यावरणजागृती विषयक आढावा<br>**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार** | ६८-७३ |
| १६ | संयुक्त पुरोगामी आघाडी शासन काळातील भारतीय परराष्ट्र धोरणातील भारत-अमेरिका संबधाचा आढावा<br>**डॉ. बाळासाहेब बजरंग सरगर** | ७४-७६ |
| १७ | पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या काळातील परराष्ट्र धोरण भारत व चीन संबंधात सहकार्य आणि आव्हाणे<br>**प्रा. डॉ. टी. एम. पाटील** | ७७-७९ |
| १८ | भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्कालीन भारतीय नेतृत्वाचा प्रभाव<br>**प्रा. निलंगेकर एस. एस.** | ८०-८२ |
| १९ | पंडीत जवाहरलाल नेहरूची विदेशनिती<br>**प्रा. डॉ. एन. आर. कन्हाके** | ८३-८५ |
| २० | मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापनः सातत्य किंवा बदल<br>**डॉ. गजानन बनचरे** | ८६-९४ |
| २१ | पंडित नेहरू यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचारः एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. शंकर लेखणे** | ९५-९९ |
| २२ | भारताच्या परराष्ट्र धोरण निर्मितीमधील पंडित नेहरू यांचे योगदान<br>**बांगर आकाश शेषराव** | १००-१०४ |
| २३ | २०१४ ते २०१९ या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप<br>**प्रा. डॉ. विनोद राठोड** | १०५-१०८ |
| २४ | भारताचे परराष्ट्रीय धोरण: आवलोकन<br>**डॉ. दयाराम द. मस्के** | १०९-११७ |

# १५. भूराजनीतीक संकल्पना, मूलभूत तत्वे, आणि जागतिक पर्यावरणजागृती विषयक आढावा

**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार**
भूगोल विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.

**प्रस्तावना**

आधुनिक जगात कोणतेही राज्य एकटयाने जीवन जगू शकत नाही. स्वयंपूर्ण राहूच शकत नाही. सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय असो. या सर्व क्षेत्रात कोणत्याही राज्यांना एकमेकाशी संबध ठेवणे भाग पडते. असेही म्हणता येईल, की राज्याला राजकारणाने प्रेरित होऊन आपली विदेश नीती किंवा परराष्ट्रीय धोरण आखण्याचा निश्चित करण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे एक निश्चित दिशा राज्याला प्राप्त होऊन तिने निश्चित केलेली उदिष्टे गाठता येतात. तेव्हा राष्ट्रधोरणाची निश्चिती करणे ही आधुनिक काळातील राज्याची महत्वाची गरज मानली जाते. अशा विदेश नीतीला विविध प्रकारे स्पष्ट करता येते.

**अर्थ**

विदेश नीती म्हणजे राज्याने परराज्यांना किंवा आंरराष्ट्रीय व्यवहारासंदर्भात राष्ट्रीय उदिष्टांची पूर्तता करण्यासाठी आखलेले धोरण होय. विदेश नीती एक गतिशिल तत्व आहे. ज्यात आवश्यक आणि परिस्थितीनुरूप बदल होत जातो. ती स्थिती स्थिर राहू शकत नाही. तर राष्ट्रीय हित आणि ध्येय यानूरूप बदल केले जातात. राज्याच्या एकंदर व्यवहाराचे पध्दतशीरपणे स्वरूप म्हणजे विदेश नीती दीर्घकालीन अनुभवाच्या आधारावर ती विकसित केली जाते. उदेश राज्याचे व्यवहार किंवा आचरण आपल्या हितरूप करून घेणे ठरते. परराष्ट्र धोरणाचे उदिष्ट विशिष्ट सीमेत नसावे, असेही मत व्यक्त केले जाते. दुसऱ्या राज्यांच्या व्यवहारात किंवा आचरणात बदल करण्याचे विदेशी नीतीचे उदिष्ट सीमित असू नये, तर त्यांना नियमित करण्याचे असावे. उदिष्टात दोन्ही गोष्टी अभिप्रेत असतात. एक म्हणजे दुसऱ्या राज्यांच्या व्यवहारात बदल अपेक्षीत असतो. दुसरी गोष्ट म्हणजे त्यात कोणताही बदल होऊ नये, ही अपेक्षा असते.

जगातील कोणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करताना त्याविषयीची काही मूलभूत तत्वे निश्चित करावी लागतात. त्याचे एखाद्या परराष्ट्राशी कोणत्या प्रकारचे संबंध असावेत. त्या संबधातून कोणत्या गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करावा आणि त्यासंबंधीचे अंतिम ध्येय कोणते असावे इत्यादी प्रश्नासंबधी त्यास साधक-बाधक विचार करावा लागतो. म्हणजे प्रत्येक राष्ट्राला परराष्ट्राशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी निश्चित केलेल्या तत्वांना व धोरणांना त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण असे म्हटले जाते.

**भूराजनिती**

भूगोलाचा आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाला भूराजनीती म्हणतात, दुसऱ्या शब्दात, भूराजनीती ही परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करण्याची पध्दत आहे. जी भौगोलिक

परिवर्तनांद्वारे आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी समजून घेते त्याचा अर्थ लावते आणि अंदाज लावते. भौगोलिक घटक या अंतर्गत, त्या क्षेत्राचे क्षेत्रफळ, हवामान, स्थलाकृति, लोकसंख्याशास्त्र, नैसर्गिक संसाधने आणि उपयोजित विज्ञान इ. घटक येतात.

भूराजनिती हा शब्द रुडॉल्फ क्षेलेन यांनी 1899 मध्ये प्रथम वापरला होता. भूराजनीतीचा उद्देश राज्यांमधील संबंध आणि त्यांच्या परस्पर स्थितीवर भौगोलिक परिमाणांचा प्रभाव अभ्यासणे हा आहे. त्याच्या अभ्यासाचे अनेक ऐतिहासिक टप्पे आहेत. जसे की मध्य आशियातील ब्रिटिश साम्राज्यवाद आणि रशियन झारवाद यांच्यातील वसाहतीच्या काळातली स्पर्धा, नंतर शीतयुध्दाच्या काळात अमेरिकन साम्राज्यवाद आणि सोव्हिएत युनियन यांच्यातील स्पर्धा इ.

भू–राजकारणातील प्रमुख विचारवंतांमध्ये हॅलफोर्ड जॉन मॅकॅंडर यांचे नाव ठळकपणे घेतले जाते. 1904 मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा 'द जिओग्राफिकल पिव्होट ऑफ हिस्ट्री' हा लेख भूराजनीतीच्या लेखनातील एक अप्रतिम उदाहरण आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दांमध्ये भू–राजकारण आधिकाधिक लोकप्रिय झाले, परंतु जर्मन विचारवंतांनी ते त्यांच्या स्वतःच्या साम्राज्यवादी महत्वाकांक्षेचे स्त्रोत बनवले, ज्यामूळे या शोधात्मक विचारसरणीचा अपमान झाला. दुसऱ्या महायुध्दानंतर ते जवळजवळ नाकारले गेले. 90 च्या दशकातील शीतयुध्दाचा कळस आणि ब्रझेन्स्की सारख्या विचारवंतांनी या मताचे पुनः प्रमाणिकरण केले जो भूराजनीतीक पुनर्जीवनाचा आधार ठरला.

भौगोलिक राजकारणाच्या विकासात शीतयुध्दाचे अनेक टप्पे महत्तवाचे आहेत, जसे की क्यूबन क्षेपणास्त्र संकट (1962) 15 वर्षांचे व्हिएतमान युध्द ( 1975) 10 वर्ष अफगाणिस्तान गृहयुध्द (1989)बर्लिनची भिंत आणि जर्मनी पुनर्मिलन (1989) आणि सर्वात महत्तवाचे म्हणचे सोव्हिएत यूनियनचे विघटन (1989) आणि सध्या सूरू असलेले युक्रेन–रशिया युध्द. (2022)

भौगोलिक राजकारणाच्या संकल्पनेचे प्राबल्य हे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात साम्राज्यवादात होत असलेल्या गुणात्मक बदलांशी देखील संबधित आहे. ब्रिटनचे भारतातील अनूभव हे साम्राज्यवादाच्या अनूभवांपैकी एक महत्वाचे अनूभव होते. राजकीय राजवटीच्या मर्यादा स्पष्ट दिसत होत्या. आणि ब्रिटिशांचा सूर्य आकाशाकडे सरकत होता. आफ्रिकन देशावरही त्याचे दूरगामी परिणाम झाले आणि अनेक देशांनी साम्राज्यवादाविरूध्द स्वातंत्र्य मिळवले. भू–राजकारणातील त्याचे महत्व अशा प्रकारे समजले जाऊ शकते की भौगोलिक परिस्थितीने साम्राज्यवादाच्या विरोधातील चेतनेवर प्रभाव टाकला, उदा. आफ्रिकन खंडात वर्णभेद वसाहतवादाचा एक घटक मानला जात असे आणि दक्षिण आशियामध्ये सांप्रदायिकता वसाहतवादाचे उत्पादन मानले जात असे. अशा प्रकारे, खंडामध्ये राष्ट्रे निर्माण झाल्यानंतर त्याचे खंडीय संबंध आणि आंतरखंडीय संबंधांवर साम्राज्यवादाविरूध्दच्या संघर्षाच्या अनुभवांचा प्रभाव दिसून आला.

भू–राजनीती ही वसाहतवादी शक्तीच्या अनुभवांशी जोडलेली जागतिक व्यवस्थेची दिशा आहे, म्हणून त्याची विचारसरणी वसाहतीक काळात प्रत्येक राष्ट्राच्या अनुभवांचे प्रतिबिंब आहे.

ग्रेट गेम संकल्पना 19 व्या शतकातील दोन महान शक्तींच्या संघर्षाची ही एक मनोरंजक संकल्पना आहे. ब्रिटनची आवडती वसाहत ही भारतीय उपखंड होती, तिथल्या संसाधनांना आव्हान देण्यात यशस्वी होणे ही त्यावेळी ब्रिटनची प्राथमिकता होती. युरोपीय शक्तींपैकी नेपोलियनच्या नेतृत्वाखाली फ्रान्सला आव्हान वाटले, परंतु ते प्रत्यक्षात

येऊ शकले नाही. त्यानंतर रशिया एक खंडीय शक्ती म्हणून प्रकट झाला. औपनिवेशिक कालखंडातील एक महत्त्वाच्या टप्प्यावर, जागतिक व्यवस्थेचे दोन स्पष्ट पैलू दिसू लागले. एक प्रणाली महासागरांद्वारे पृथ्वीवरील संसाधनांवर नियंत्रण ठेवणारी होती, तर दुसरी प्रणाली आशिया खंडातील वर्चस्वासाठी नवीन संघर्षाकडे झुकलेली होती.

वसाहतवाद हा एक ऐतिहासिक अनूभव आहे. परंतू राष्ट्रांच्या निर्मितीची प्रक्रिया आणि त्यांच्यातील वर्गनाही निर्मिती ही जागतिक व्यवस्था दर्शवते. नातेसंबधाची व्याख्या वर्गीय जाणीवेने ठरवली जाते. युरोपियन समाज आणि इतर समाजांच्या अनूभवां मध्ये तुलनेने जास्त फरक आहे.

भू–राजकारणाचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे शीतयुध्द. शीतयुध्दाच्या काळात सोव्हिएत युनियन आणि युनायटेड स्टेट्स यांच्यात विचारधारेवरून तीव्र संघर्ष झाला आहे. साम्यवाद किंवा मार्क्सवादाच्या विचारसरणीने नवीन राष्ट्रामध्ये आपला ठसा उमटवला. त्यामूळे भांडवलशाही देशांशी संघर्ष झाला. हे वैर तिसऱ्या जगातील देशांमध्येही पसरले. आणि अशा वेळी या देशांना आपल्याकडे खेचण्याचा आग्रह भूराजनीतीच्या रूपात दिसून आला. त्याचे परिणाम सकारात्मक तसेच नकारात्मक होते. काही देशांनी याला नफ्याची संधी म्हणून पाहिले, म्हणून त्यांनी त्यांच्या आर्थिक विकासाच्या संधीचा फायदा घेतला. तर काही देशांसाठी विघटन हे युध्द आणि अशांततेचे समानार्थी शब्द बनले.

**भू–राजकीय संकल्पना आणि मूलभूत तत्वे**

विचार करण्याच्या पध्दतीला भू–राजकारणात विशेष महत्त्व आहे. संपूर्ण जगाला एक घटक मानून देशांच्या वर्तनावर निर्णायक विधाने करणे ही एक गुंतागुतीची प्रक्रिया आहे. राष्ट्र जीवनाच्या अत्यावश्यक परिस्थितीची पूर्तता करण्यासाठी संसाधनांचा अखंड पुरवठा राखणे हे भू–राजकारणाचे अंतिम उदिष्ट आहे. हे येथे नमूद करणे उपयुक्त ठरेल.

सर हॅल्फोर्ड जॉन मॅकेंडर यांची 1904 ची संकल्पना 'द जिओग्राफिकल पिव्होट ऑफ हिस्ट्री', पृथ्वीच्या कवचावरील महाद्‌विपाच्या आराखडयाची ऐतिहासिक समज आणि त्यामूळे प्रभावित झालेल्या विविध राष्ट्रीय समुदायांचे वितरण हे त्यांच्या परस्पर स्थानिक आणि देशीय संबधाचे स्पष्टीकरीण देण्यास सक्षम आहे हे त्याचे मूळ आहे. त्यामूळे भविष्यातही या घटकांचा राष्ट्रांमधील संबधावर परिणाम होणार आहे. असाच एक आकृतिबंध म्हणजे हृदयस्थळ किंवा हार्टलॅंड.

हार्टलॅंड संकल्पनेनुसार, समुद्राच्या पाण्याचा व्यापाराच्या वापरामुळे, युरोप–आशिया खंडातील क्षितिज भाग एकमेंकाच्या संपर्कात आले. मध्यवर्ती भागाच्या पारंपारिक व्यवस्थेला पर्याय म्हणून हे किनारी भाग उदयास आले. पांरपारिक पध्दतीनुसार, पांरपारिक जमिनीच्या मार्गावर काफिल्यांद्‌वारे व्यापार केला जातो. मॅकिंडरच्या मते, इतिहासात काही मोठया प्रक्रिया आहेत, ज्या सामान्य ऐतिहासिक आकलनाच्या पलिकडे आहेत. अशीच एक ऐतिहासिक प्रक्रिया युरोपमधील राष्ट्र–राज्यांची उत्पत्ती होती.

मॅकेंडरच्या मते, यूरोपचा उदय हा आशियाई आक्रमणकर्त्यांच्या सततच्या झूंजीमूळे निर्माण झालेल्या चेतनेचा परिणाम आहे. हूणांच्या क्रूर आक्रमणांमूळे युरोपला आशियाई शक्ती आणि आकाराची जाणीव झाली. इतकेच नव्हे तर पूर्व युरोपातील वांशिक रचनेत याने घडवलेले बदल हे निरोधक म्हणून प्रस्थापित झाले. हा विचार विशिष्ट संबंध

स्पष्ट करतो. महाद्विपीय एकसंघतेची अनुभूती केवळ महासागराच्या तरंगातूनच शक्य झाली आहे. त्यामूळे मॅकिंडरच्या विचारात द्वैतभाव आहे. भू– राजकारणाचा महत्वाचा भाग म्हणजे भौगोलिक संसाधनाची मालकी. ही मालकी भूसामरिक संसाधनाच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाची आहे. ऊर्जा संसाधने हे असेच एक चिन्हांकित क्षेत्र आहे.

**पर्यावरण आणि पर्यावरणवाद**

वर्तमानकाळात जगामध्ये प्रचंड प्रमाणात पसरलेल्या प्रदूषणामूळे पर्यावरणाचे संतूलन राखण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जगातील वाढती लोकसंख्या, पाण्याचे प्रदूषण, विविध प्रकारचे विषारी वायू, रासायनिक प्रदुषण, विज्ञान, तंत्र विज्ञानाचा प्रमाणबाहय प्रसार, ध्वनिप्रदूषण यामूळे पर्यावरणावर विपरीत परिणाम झाला आहे. यापूर्वी पर्यावरणाच्या ऱ्हासाचा जागतिक पातळीवर गंभीरपणे विचार झालेला नाही. परंतू आज प्रदूषणामूळे जगात ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यामूळे पर्यावरणाचा ऱ्हास सर्वच राष्ट्रांना भेडसावत आहे. वस्तूतः आपल्या राज्याच्या परिसरात प्रदूषणापासून सरंक्षणाची दक्षता घेणे हे आंतरराष्ट्रीय कायद्याबाबत सर्वच राज्यांचे कर्तव्य ठरते. परंतू विकसीत आपल्या देशाचा विकास करत असताना औद्योगिकिरणा अवंलब करत आहेत ज्यामूळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होऊन इतर राज्यांच्या पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

**पर्यावरणीय प्रश्नांचे स्वरूप**

1. जागतिक स्वरूपाचा प्रश्न :– जागतिक पर्यावरणीय राजकारणात काही पर्यावरणीय प्रश्न हे जागतिक स्वरूपाचे असल्याने त्याची दखल घेण्यात येते.
2. संाधन संपत्तीविषयक प्रश्न :– दुसऱ्या प्रकारचे प्रश्न हे जागतिक सामाजिक साधन संपत्तीबाबतचे आहे. ज्या प्रकारची साधन संपत्ती आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्वांनी वाटून घ्यायची असते. त्या साधन संपत्तीविषयक प्रश्न यात येतात.
3. आंतरराष्ट्रीय प्रश्न :– तिसऱ्या प्रकारचे प्रश्न मुळातच आंतरराष्ट्रीय असतात. म्हणजे ते राष्ट्रांच्या सीमेपलीकडे जातात. वातावरणातील प्रदूषित वायू किंवा आम्लयूक्त पाऊस हे देशाच्या सीमांतर्गत न राहता कोठेही पसरू शकणारे असतात व आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण होतात. असे प्रश्न जगाच्या अनेक भागात निर्माण होताना दिसतात.
4. पर्यावरणाचा ऱ्हास :– चौथ्या प्रकारचा प्रश्न म्हणजे अतिवांरवार करण्यात येणाऱ्या काही प्रकियामूळे होणाऱ्या पर्यावरणाचा ऱ्हास काही स्थानिक किंवा विशिष्ट देशापुरत्ता मर्यादित असला, तरी जगातील इतक्या विविध भागात आढळतो, की मग तो जागतिक प्रश्न बनतो. काही विशिष्ट पध्दतीने केली जाणारी शेती, मातीची धूप, जंगलतोड, नद्यांचे प्रदूषण आणि शहरीकरणाशी निगडित असलेल्या आणि औद्योगिकरणामूळे निर्माण झालेल्या आहेत.
5. पर्यावरणीय समस्या :– साधन संपत्तीचा अतिरेकी वापर करणाऱ्या प्रकिया आणि पर्यावरणीय ऱ्हास हे व्यापक राजकीय तसेच आर्थिक, सामाजिक, प्रक्रियाशी जोडले असतात. या प्रकिया जागतिक, राजकीय अर्थव्यवस्थेचा असतात. म्हणजेच हे लक्षात घ्यायला हवे की बहूतेक पर्यावरणीय समस्या या संपत्ती, ज्ञान आणि सत्ता यांच्या निर्माण व वितरणाशी संबधित असतात.

**पर्यावरण जागृती विषयक आढावा**

पर्यावरणीय मुद्दे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पटलावर उपस्थित व्हायला लागले. ते 19 व्या शतकात युरोपातील आयोग किंवा आंतर संघटना या संस्था सुरुवातीस नद्यांमधील व्यापार किंवा जहाजांची सुरक्षितता अशा मुद्द्यांवर कार्य करीत होत्या. त्या 20 व्या शतकाच्या मध्यावर नद्या व सागरी पाण्याचे प्रदूषण थांबविण्याचे महत्त्वाचे काम करू लागल्या. 1948 मध्ये द्राक्षबागांच्या वेलीवर पडणाऱ्या किडीवर आळा घालण्यासाठी युरोपातील देशांनी एकत्र येऊन पहिला आंतरराष्ट्रीय वनस्पतीविषयक करार केला. पुढे त्याच धर्तीवर प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर वनस्पतीविषयक करार मालिका झाल्या. पक्ष्यांच्या संरक्षणासाठी 1902 मध्ये भरलेल्या एका परिषदेत शेतीला उपयुक्त पक्ष्यांच्या संरक्षणाचा प्रश्न प्रथम मांडला गेला. 1911 मध्ये अमेरिका, कॅनडा आणि रशियाने फरसील या प्राण्याच्या संरक्षणासाठी करार केला. 1945 मध्ये संयुक्त राष्ट्राची अन्न व शेती संघटना स्थापन झाली आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण हे तिच्या अधिकारामध्ये अंतर्भूत करण्यात आले. फरसील्सप्रमाणेच केलेल्या शिकारीवर निर्बंध घालणारी हानीबाबत जाणीव–जागृती व्हायला लागली. रॅशेल कार्स्टन यांच्या सायलेंट स्प्रींग या पुस्तकाने डी.डी.टी या व तत्सम इतर कीटकनाशकाबाबत माहिती दिल्यानंतर आधुनिक पर्यावरणीय चळवळीची सुरुवात झाली. किरणोत्सर्गाचे मानवी शरीरावर आणि इतर प्राथमिक चाचण्यांना होणारा विरोध संघटित होऊन तशा चाचण्यांवर बंदी घालणारा करार करणे महासत्तांना भाग पडले. 1967 साली टोरी कॅथन तेलवाहू जहाजातून झालेल्या तेलगळतीनंतर आंतरराष्ट्रीय सागरी संघटना ते प्रदुषणापासून समुद्राचे रक्षण करण्याच्या कामाला सुरूवात झाली. याच सुमारास समुद्रविषयक कायद्यामध्ये सुधारण करण्याची चर्चा सुरु झाली. समुद्र किनाऱ्यावर मिळणे, समुद्राचा उपयोग आंतरराष्ट्रीय सागरी क्षेत्र आणि समुद्रतळ या विषयाची नवी यंत्रणा निर्माण करणे नवीन कायद्याकडून अपेक्षित होते या नव्याने येऊ घातलेल्या नियम व्यवस्थानी जुन्या व्यवस्था कोलमडत होत्या.

1972 साली संयुक्त राष्ट्रांनी मानवी पर्यावरणविषयक परिषद स्वीडनच्या राजधानीच्या ठिकाणी भरली होती. पर्यावरण विषयक ज्या नव्या जाणिवा आणि आस्था 1960 च्या दशकात निर्माण झालेल्या होत्या त्यांच्यासंदर्भातच ही परिषद भरली होती. तिचे मुख्य उदिष्ट प्रदुषण आणि पर्यावरणाच्या राजकारणाला एक नवे वळण दिले. या परिषदेत जी तत्वे मान्य करण्यात आली आणि ज्या संस्था व कार्यकम सुरू करण्यात आले त्याचा परिणाम दीर्घकालीन स्वरूपाचा होता, त्याचप्रमाणे परिषदेतील चर्चामध्ये पुढील 20 वर्षातील पर्यावरणीय विषय आणि व्यवहार कोणते असणार हेही स्पष्ट केले होते.

**सारांश**

काही वर्षापासून समुद्रातील तेलाचा प्रसार होत असल्यामूळे त्याचे पर्यावरणावर अनुचित परिणाम दिसू लागले दृ सत्तरीच्या दशकापासून प्रदूशणांच्या समस्येवर गंभीरपणे विचार होऊ लागला. 1972 मध्ये स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रातर्फे आयोजित संमेलनात पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे या विषयावर चर्चा होऊन त्यातूनच संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम जाहिर करण्यात आला. सन 1973 मध्ये पश्चिम आफ्रिकेतील वाळवंटाच्या वाढत्या विस्तारावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतू हे प्रयत्न कमी पडले जागतिक तापमानातील वाढ ओझोन वायूमधील निरंतर घट व जलप्रदुषणाच्या समस्या गंभीर होत गेल्या. 1980 मध्ये ओझोन गॅस सुरक्षित ठेवण्यासाठी विषारी गॅसच्या उत्सर्जनावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टिने काही संधी झाल्या. 1983 मध्ये महासभेमार्फत व विश्व आयोगाचे पुढाकाराने

वर्तमान व भावी पिढयांच्या कल्याणार्थ पर्यावरणाची संसाधने सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने निर्धार करण्यात आला. आयोगाच्या शिफारशीनूसार जागतिक पातळीवर पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक देशात पैसा पुरविण्यात आला. 1994 मध्ये जागतिक पर्यावरण सवलतीद्वारे पैसा पुरविण्यात येऊन पर्यावरण संतूलन राखण्याचा प्रयत्न झाला. शेष योजनेत विश्व बँकेच्या कार्यभागही महत्वाचा आहे. या संघटनेद्वारे जैविक विविधता सुरक्षित ठेवण्याचे तसेच जागतिक हवामान व परिवर्तनावर लक्ष ठेवण्याचे कार्य या संघटनेकडे सोपविण्यात आले आहे.

**संदर्भ**

1. डॉ वा. भा. पाटील, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव
2. विश्व राजनीति और भारत की सामरिक चुनौतियाँ (बोधि बुक्टर )
3. रमेश दत्त दीक्षीत, राजनीतिक भूगोल – संसामयिक परिदृष्टि
4. Devetak et al (eds), An Introduction to international Relations, 2012

Indian Council of Social Science Research

Affiliated To Sant Gadge Baba Amravati University Amravati

Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon Sanchalit

# MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE,

WASHIM, DIST - WASHIM (M.S.) 444 505

NAAC Accredited With'B'Grade

ICSSR Sponsored One Day National Level Interdisciplinary Seminar on

## 'India's Post Independence Foreign Policy : Obstacles and Challenges'

Under the Scheme Azadi Ka Amrit Mahotsav

Organized by Department of Public Administration

## CERTIFICATE

This is to certify that Prof. / Dr. / Mr. / Mrs. प्रा. डॉ. दिलीप नि. ओंजेवार

Of भूगोल विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

Has attended the Seminar as Inaugurator / Keynote person / Chairperson / Resource Person / Chief Guest / Participant on 23 April 2022. He / ~~She~~ presented a paper on "भूराजनीतिक संकल्पना, मूलभूत तत्वे, आणि जागतिक पर्यावरण जागृती विषयक आढावा"

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College
Washim Dist. Washim

| President | Principal | Convener |
|---|---|---|
| Dr. N.J. Gote | Dr. G.S. Kubade | Dr. V.A. Gaikwad |